दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १०६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१६ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# नवकार लॉजिस्टिक मधून ३६२ कोटींचे हेरॉईन जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल जवळील अजिवली हद्दीतील नवकार लॉजिस्टिक मधून परदेशातुन अवैधरित्या आयात केलेले ३६२.५९ कोटी रुपयांचे हेरॉईन नामक अंमलीपदार्थ हस्तगत करण्यात आला असून हा राज्यातील मोठा साठा नवी मुंबई पोलिसांनी हस्तगत केल्याचे समजते.**

गुन्हे शाखा, नवी मुंबई येथे पंजाब पोलीसांचे स्पेशल ऑपरेशन सेल कडुन पोलीस आयुक्तालय हद्दीतील न्हावाशेवा पोर्ट, नवी मुंबई येथे दुबई येथून कंटेनर मध्ये अंमली पदार्थ दडवून दि. १५/१२/२०२१ रोजी भारतात आणल्याची व सदरच्या कंटेनर मधील माल घेण्यासाठी अद्यापही कोणी आले नसल्याची माहीती पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा यांना मिळाली होती. प्राप्त झालेल्या माहितीची पोलीस आयुक्त, बिपीनकुमार सिंह यांनी गंभीर दखल घेवुन पोलीस उप आयुक्त सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली व अपर पोलीस आयुक्त महेश घुर्ये यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, नवी मुंबईच्या पोलीस पथकाने सदर कंटेनरचा शोध घेतला असता सदरचा कंटेनर हा दुबई येथुन न्हावाशेवा पोर्ट येथे आयात केला असल्याचे व सदर कंटेनर नवकार लॉजीस्टीक, सर्वे नं. १३७/१९/१, नवीन आजिवली गाव, जुना मुंबई पुणे महामार्ग पनवेल येथे उतरविण्यात आल्याची गोपनीय माहिती अत्यंत वेगाने मिळाली होती.

सदर कंटेनर मधील आयात केलेल्या मार्बल्स घेवून जाण्यास कोणीही दावा न केल्याने सदर कंटेनरचा संशय आल्याने कंटेनरची पंचासमक्ष पाहणी करण्यात आली असता त्यामधील मार्बल्स पुर्णपणे कंटेनरच्या बाहेर काढल्यानंतर कंटनरचे दरवाजाला असलेल्या फ्रेमची बारकाईने पाहणी केली असता फ्रेममध्ये कोणतातरी अंमलीपदार्थ लपविला असल्याचा संशय बळावल्याने कंटेनरचा दरवाजा व त्यावरील फेम कटर मशिनच्यासहाय्याने कापण्यात आले असता त्यामध्ये हेरॉईननामक अंमलीपदार्थ असलेले ७२.५१८ कि.ग्रॅ. वजनाचे व सुमारे ३६२.५९ कोटी रुपये किंमतीचे प्लॅस्टीक कागदाच्या वेष्टनामध्ये पॅक केलेले एकुण १६८ पॅकेट्स मिळुन आले. याबाबत पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापरावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २२ (क), २३ (क), २९ कलमान्वये सदरचा (अंमली पदार्थ (हेरॉईन) संगनमत करून अवैधरित्या भारतात आयात करणारे निर्यात करणारे, शिपर्स व आयात व निर्यात दरम्यान प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरीत्या मदत करणाऱ्या इसांमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन पुढील तपास गुन्हे शाखा, (विशेष तपास पथक ) करत आहेत.



## ५० मधला एकही आमदार पडला तर राजकारण सोडेन : एकनाथ शिंदे



**दै.रायगड नगरी । मुंबई**

सगळे विरोधक एकमुखाने सांगतायत की ५० मधला एकही आमदार निवडून येणार नाही. त्यांना मी सांगू इच्छितो, याअगोदरचे बंड वेगळे होते. त्या–त्यावेळची परिस्थिती वेगळी होती. आताचं बंड नसून उठाव होता. ५० मधला एकही आमदार पडला तर मी राजकारण सोडेन, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

शिवसेना आमदार आणि माजी मंत्री अब्दुल सत्तार यांनी नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम मुंबईतील रवींद्र नाट्य मंदिरात आयोजित केला होता. या सत्कार सोहळ्याला उत्तर देताना एकनाथ शिंदे यांनी जोरदार फटकेबाजी केली. एक दोन आमदार आले असते तर ठीक पण पन्नास आमदार काही मागणी नसताना येतात, माझ्यावर विश्वास दाखव–तात ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट असल्याचं एकनाथ शिंदे म्हणाले. विरोधकांनी कितीही वेळा सांगू द्या, बंडखोर आमदार निवडून येणार नाही. पण मी ठणकावून सांगतो, एकही आमदार पडणार नाही आणि ५० मधला एकही आमदार पडला तर मी राजकारणातून निवृत्ती घेईन, असं एकनाथ शिंदे म्हणाले. ज्यावेळी बंड केलं, त्यावेळी मी राजकीय आत्महत्या केली, असं अनेक जण सांगत होते. पण मी नेमकं काय करतोय, याची मला पूर्णपणे जाणीव होती. बंडावेळी मी ३ दिवस आणि ३ रात्र झोपलो नव्हतो. माझ्या राजकीय करिअरची मला अजिबात भीती नव्हती, कारण मी ५० आमदारांच्या भवितव्याची चिंता केली होती, असंही शिंदे म्हणाले. औरंगाबादचं संभाजीनगर नामांतर करण्याबाबत ठाकरे सरकारने घेतलेल्या निर्णयाला शिंदे सरकारने स्थगिती दिल्यावरुन चर्चांना उधाण आलं होतं. मात्र आपण नामकरणाला स्थगिती दिलेली नाही, संभाजीनगर हे नाव शिवसेनाप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या मुखातून निघालंय, त्यामुळे उद्या सकाळीच कॅबिनेट बैठक घेऊन संभाजीनगर नावावर शिक्कामोर्तब करणार, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं.

## १२ लाखाचे दागिने चोरणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी केले अटक

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण खाटिक मोहल्लूयात महाड अर्बन बँक समोरील बंद दुकानाच्या खिडकीची काच फोडून लोखंडी ग्रील उचकून दुकानात प्रवेश करून दुकानाच्या ड्राव्हर मध्ये ठेवलेला सोन्याचा १२ लाख ५२ हजार १५० रूपये किंमतीचा माल चोरी केल्याची घटना घडली होती.

या चोरीचा तपास पेण पोलिस ठाण्याचे पोलीस निरिक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शना खाली करताना जुना,पनवेल मुस्लीम नाका येथील २ आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी या चोरीच्या घटनेचा तपास जलद गतीने लावून २ आरोपींना अटक केल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. पेण शहरात वाढत्या चोऱ्यांमुळे नागरीक भयभीत झाले असुन चोरांचा बंदोबस्त करून शहारत घडलेल्या चोऱ्यांच्या तपासही पोलिसांनी लवकरात लवकर लावण्याचे नागरिकांमधून मागणी होत आहे. दोन आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असुन अधिक तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक बेग करत आहेत.

## खोटे लग्न व वारंवार अनैतिक संबध ठेवून रोह्यात तरुणीची फसवणूक ; आरोपी अटक

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोह्यात एका ३० वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी अनैतिक संबध ठेऊन त्याचप्रमाणे लाखो रुपयांची फसवणूक शिवीगाळ व मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका भामट्या विरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रोहा पोलिसांकडून या आरोपीला अटक केली आहे.

हनुमंत उर्फ हेमंत नामदेव खोचारे असे आरोपी व्यक्तीचे नाव असून तो ठाणे जिल्ह्यातील कल्याण पूर्व विभागातील साई दिंगबर सोसायटी समर्थ नगर येथील रहिवाशी आहे.या इसमाने रोहे शहरात राहणाऱ्या एका ३० वर्षीय तरुणी बरोबर मैत्री करून तिच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन तिला लग्नाचे आमिष दाखविले. त्यानंतर या इसमाने एवढ्यावरच न थांबता तिच्याशी खोटे लग्न करून तिच्यावर रोहा, कल्याण, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी वेळोवेळी बलात्कार केला. तसेच सदर तरुणीची गुगल पे व इतर मार्गाने ११ लाख ४ हजार सहाशे रुपयांची फसवणूक केली. त्यांनतर पुढे …/२

### जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून हारक्युलस हॉईस्टच्या कामगारांना भरघोस पगारवाढ आणि सुविधा

## कंपनी आणि कामगार यांचे ऋणानुबंध महत्वाचे : आ.प्रशांत ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून खालापूर तालुक्यातील धामणी येथे असलेल्या हारक्युलस हॉईस्ट लिमिटेड कंपनीमधील कामगारांना भरघोस पगारवाढ व सोयीसुविधा देण्याचा करार संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (दि. १५) संपन्न झाला.

या कार्यक्रमाला अनपेक्षितपणे रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रविंद्र चव्हाण माजी पालकमंत्री रविंद्र चव्हाण, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व नवनिर्वाचित विधान परिषदेचे सदस्य श्रीकांत भारतीय यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी कंपनीतर्फे व्हाईस चेअरमन विवेक महेंद्रु व कंपनीचे सेक्रेटरी किरण मुकादम, संघटनेतर्फे अध्यक्ष जितेंद्र घरत, संघटनेच्या सचिव समिरा चव्हाण, संघटक रवींद्र कोरडे, चंद्रकांत कडू, युनिट अध्यक्ष विशाल बारस्कर, उपाध्यक्ष अविनाश जाधव, सरचिटणीस अल्ताफ शेख, चिटणीस कल्पेश मांडलेकर, खजिनदार कल्पेश मेहेतर, सह खजिनदार रविंद्र कुडपाने, सदस्य राम जाधव उपस्थित होते.

चार वर्षासाठी झालेल्या करारानुसार कामगारांना १२ हजार ५०० रुपयांची दरमहा पग–ारवाढ (पहिल्या वर्षी ४२००, दुसऱ्या वर्षी ३२००, तिसऱ्या वर्षी ३१०० व चौथ्या वर्षी २००० रुपये), ३० हजार रुपये बोनस, तीन लाख रुपयांचा फॅमिली मेडीक्लेम पॉलीसी, सणांसाठी ७० हजार रुपये अड्वान्स, कामगारांना वार्षिक सहल, त्याचबरोबर रजा व इतर सेवा सुविधा …/२

## संक्षिप्त...

### हिंदुत्व या समान धाग्यामुळे सरकारला पाठिंबा : राजू पाटील

**दै.रायगड नगरी । डोंबिवली**

कोणत्याही अपेक्षेने किंवा मंत्रीपदाच्या अपेक्षेने आम्ही सरकारला पाठिंबा दिलेला नाही, हिंदुत्व हाच आमच्यात आणि त्यांच्यात समान धागा आहे. त्यामुळे राष्ट्रपतीपदाच्या उमेदवार द्रोपदी मुर्मू यांनाही आमचा पाठिंबा असल्याचे मत मनसेचे आमदार प्रमोद (राजू) पाटील यांनी व्यक्त केले. भाजप आणि आताच्या राज्य सरकारमध्ये हिंदूत्व समान धागा आहे. भाजपच्या कोटयातून मनसेच्या एका नेत्याला विधानपरिषदेवर आमदारकी मिळत असेल तर निश्चितच आनंद आहे. विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात आमचा आवाज असेल आणि असे जर घडले तर स्वागत आहे. सध्याचे सरकार जनहिताचे निर्णय घेत आहे. पेट्रोल डिझेलचे दर कमी करण्यात आले आहेत. सरकार पुढेही जनहिताचे निर्णय घेईल, अशी आशा आहे, असे पाटील म्हणाले. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिव–तीर्थ निवासस्थानी जाऊन मनसे प्रमुख राज ठाकरेंची भेट घेतली. या भेटीच्यावेळी अन्य मनसे नेत्यांसह आ. पाटील देखील त्याठिकाणी होते. याबाबत पाटील यांना विचारले असता फडणवीस साहेबांनी राज साहेबांची घेतलेली भेट ही सदिच्छा भेट होती. मधल्या काळात राज ठाकरेंनीदेवेंद्र फडणवीसांना पत्र पाठवले होते. ते पत्र त्यांना आवडले होते. त्यानंतर फडणवीस सदिच्छा भेट घेण्यासाठी शिवतीर्थ निव–ासस्थानी आले होते. यावेळी त्यांनी राज साहेबांच्या प्रकृतीचीही विचारपूस केल्याचे पाटील यांनी सांगितले.

## शिक्षणदानाचे काम महत्वपूर्ण : वर्षा ठाकूर



**दै.रायगड नगरी । पनवेल**

विद्यार्थी आपल्या गुरुकडे पाहून अनेक गोष्टी शिकत असतो. त्यामुळे शिक्षणदानाचे काम महत्वपूर्ण असते, असे प्रतिपादन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी समिती सदस्या वर्षा प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी केले. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयाच्या इंग्रजी प्राथमिक विभागाच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापक संतोष चव्हाण, सुभाष मानकर, इंग्लिश विषय सहाय्यक संजय पाटील, पालक …/२

## दारू पिऊन एसटी चालवाल तर ; चालकासह आगारप्रमुखही दोषी

**दै.रायगड नगरी । पेण**

राज्यातील 'ड्रंक अँड ड्राईव्ह' च्या दुर्घटनांवर आळा घालण्यासाठी शासनानं कायदा अधिक कठोर केला आहे. यानुसार, दारू पिऊन गाडी चालवल्यास तुम्हाला १० हजार रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. असाच एक कायदा एसटी महामंडळाने देखील केला आहे. अपघात टाळण्यासाठी एसटी बस चालकाने मद्यप्राशन केले नाही, याची खात्री केल्यानंतरच बस त्याच्या ताब्यात द्यावी, असे थेट आदेश एसटीच्या वाहतूक विभाग महाव्यवस्थापकांनी आगार प्रमुखांना दिले आहेत. यापुढे दारू पिऊन एसटी चालकांनी बस चालवली तर आगरप्रमुखांना देखील दोषी धरले जाणार आहे.

कोरोना काळात तसेच त्या नंतरच्या कर्मचाऱ्यांच्या संपामुळे एसटी महामंडळचे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. हा आर्थिक तोटा भरुन काढण्यासाठी विविध उपाय योजना सुरू आहेत. त्यानुसार अपघात रोखण्यासाठी देखील महामंडळाने कडक धोरण अवलंबिले आहे. चालकाने बस ताब्यात घेण्या आधी त्याने मद्य …/२

## पुढील आठवड्यात पनवेलमध्ये प्रदेश कार्यकारिणीची बैठक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारतीय जनता पार्टीची प्रदेश कार्यकारिणीची बैठक पुढील आठवड्यात पनवेलमध्ये होणार असून, या बैठकीच्या पार्श्वभुमीवर श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात रायगड जिल्हा कार्यकारणीची बैठक भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार श्रीकांत भारतीय, रायगडचे माजी पालकमंत्री आमदार रविंद्र चव्हाण, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी(दि. १५) पार पडली.

मार्केट यार्ड येथील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या भारतीय जनता पार्टीच्या रायगड जिल्हा कार्यकारणीच्या बैठकीला कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, भाजपचे जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, भाजप महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, महिला, मोर्चा पनवेल तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत, पनवेल महापालिकेच्या …/२

**भाड्याने देणे आहे**

जिल्हा सत्र न्यायालय समोरील, लोखंडीपाडा, पनवेल येथील हॉटेल भाड्याने देणे आहे.

संपर्क : ९८६७७०४४१६/ ९५९४०९३१११

## शिवसैनिकांवर हल्ला, उद्धव ठाकरे भडकले, पोलिसांना झापले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज भायखळ्यामधील शिवसेना शाखेला भेट देऊन पदाधिकाऱ्यांची विचारपूस केली. काल रात्री २ शिवसैनिकांच्या गाडीवर हल्ला झाल्यानंतर उद्धव ठाकरेंनी आज शिवसेना शाखेत जाऊन शिवसैनिकांशी संवाद साधला, त्यांना आधार दिला. शिवसैनिकांच्या केसाला जरी धक्का लागला तरी खपवून घेणार नाही, असा इशाराही त्यांनी संबंधितांना दिला. तसेच पोलिसांवर हलगर्जीपणाचा आरोप करत त्यांनाही झापलं.



शिवसैनिक बबन गावकर आणि विजय कामतेकर यांच्या गाडीवर गुरुवारी रात्री अज्ञातांनी हल्ला केला. त्यानंतर आज उद्धव ठाकरे यांनी भायखळा येथील २०८ नंबरच्या शाख–ेला भेट दिली. यावेळी संबंधित पदाधिकाऱ्यांनी आपल्यावर ओढावलेली आपबिती कथन केली. हल्ल्यानंतर आमची तक्रारही पोलिसांनी घेतली नाही, असं उद्धव ठाकरेंना सांगितलं. त्यावर इथल्या पोलिस ठाण्याचे इनचार्ज कोण आहेत? असं विचारत पोलिसांनी राजकारणात पडू नये, असं आवाहन उद्धव ठाकरेंनी पोलिसांना केलं.

शिवसैनिकांच्या केसाला जरी धक्का लागला तरी खपवून घेणार नाही. पोलिसांनी राजकारणात …/२

# नेरे परिसरात विजेचा लपंडाव, मनसेचा ईशारा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नेरे विभागात आकुर्ली ते धोदाणी, हरीग्राम ते मोरबे, आणि वाकडी ते दुंदरे, शिवणसई, आंबे हया ग्रामीण भागात आपले असंख्य विज ग्राहक आहेत. तरी हया संपूर्ण विभागात गेल्या १० ते १५ दिवसांपासून सतत वीजपुरवठा खंडीत होत आहे. खंडीत विजपुरवठयामुळे नागरीकांत प्रचंड मोठा संताप व्यक्त होत आहे. छोटया मोठया व्यवसायांवर याचा मोठा परिणाम होत आहे. तसेच सततच्या खंडीत विजपुरवठयामुळे अनेक घरातील विद्युत उपकरणे खराब होत आहेत. त्याला जबाबदार कोण ? त्याची भरपाई कोण देणार?असा सवाल मनसेने विचारला आहे. विजेचा सुरू असलेला लपंडाव सुरळित करण्याची मागणी करून तसे निवेदन अतिरिक्त कार्यकारी अभियंता, भिंगारी याना देण्यात आले आहे. यावेली कुणाल फडके-अध्यक्ष आदई विभाग, विश्वास पाटील-अध्यक्ष दुंदरे विभाग,विद्याधर चोरघे-अध्यक्ष नेरे विभाग, दिनेश मांडवकर-उपतालुका अध्यक्ष पनवेल उपस्थित होते. ग्रामीण भागातच नेहमी विद्युत पुरवठा खंडीत केला जात असून शहरी भागात होत नाही, त्यामुले आम्ही बीज बिल भरत नाही का? असा सवाल मनसेने उपस्थित केला. कमी प्रमाणात पाऊस सुरू असला, तरी देखील विजपुरवठा अनिश्चीत काळासाठी खंडीत केला जातो. ग्रामीण भागात विद्युत पोल उन्मळून पडतात, मेन केबल शॉटसर्किट होतो, डिओ पडले जातात. याचा अर्थ मेन्टेनन्सची कामे पूर्ण झाली नाहीत. तरी नेरे विभागात विद्युत पुरवठा सुरळीत ठेवावा. ग्राहकांचा उद्रेक झाल्यास ग्राहकांबरोबर महाराष्ट्र नवनिर्माण सेना देखील रस्त्यावर उतरेल असा ईशारा यावेळी देण्यात आला आहे.

## स्टूलने मारहाण केल्याप्रकरणी चौहान विरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानात बेकायदेशीररित्या प्रवेश करून दुकानातील स्वाईप मशीनवर कार्ड स्वाईप करून पैसे दिलेत नाहीत या कारणावरून लाकडी स्टूलने मारहाण केल्याचा प्रकार आकुर्ली बस स्टॉप येथे घडला आहे. याप्रकरणी खांदेश्वर पो-लीस ठाण्यात चौघां विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मोहनलाल चौधरी (वय ३७) यांचे उत्तम मेडिकल श्री समर्थ कृपा बिल्डिंग, आकुर्ली, बस स्टॉप येथे आहे. मोहनलाल व दुकानातील कामगार दुकानात दैनंदिन काम करत असताना एक अनोळखी इसम दुकानात आला व त्याने स्वाईप मशीनवर बँकेचे एटीएम कार्ड स्वाईप करून त्याबद्दल दोनशे रुपये द्या असे बोलला. चौधरी यांनी त्यास नकार दिला. या गोष्टीचा राग आल्याने त्यांनी शिवीगाळ करून दुकान बाहेर गेला. त्यानंतर दुसरा एक इसम त्याच्यासोबत आला व त्याने ते त्याने दुकानातील लाकडी स्टूलने चौधरी यांना मारहाण केली. व दुकानातील काचेच्या कपाटाला मारून काच फोडून नुकसान केले. त्यानंतर रात्री दोन इसमासोबत आणखी दोन अनोळखी ईसम आले व चौधरी यांना शिवीगाळ व दमदाटी केली व लाथाबुक्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी अमरराम चौधरी यांनी त्यांचे भांडण सोडवले या मारहाणीत मोहनलाल चौधरी जखमी झाले आहेत.

मा.सोनावणे साहेब कोर्ट

**अर्जदारांचे वकील**
**ॲड.एकनाथ जी. खुटले**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.३ रे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.९६९/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०८/२०२२

१) श्रीमती.मानसी महेश म्हात्रे, वय : ३८ वर्षे
२) श्री.अथर्व महेश म्हात्रे, वय : १८ वर्षे
३) श्री.आर्यन महेश म्हात्रे, वय : १६ वर्षे
अज्ञान पालन करणार आई
श्रीमती.मानसी महेश म्हात्रे
४) श्रीमती.बानुबाई मारुती म्हात्रे, वय : ६२ वर्षे
सर्व रा.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.महेश मारुती म्हात्रे हे दि.१२/०३/२०२२ रोजी मौजे : पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| पारगाव डुंगी-७३ | ३४ | १५ | ०-१९-२ |

सदर मिळकतीचे नुकसान भरपाईपोटी खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

**भूखंडाचे वाटप**

| स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मीटर |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर-दापोली | ३ | १३९ | ३१० |

अर्जदार हे कै.महेश मारुती म्हात्रे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१५/०७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.श्री.गुन्नाल सो यांचे न्यायालयात

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.हर्षदा सुनील गडकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६६३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०९/२०२२

१) श्री.सलीम मेहमूद शेख
वय वर्षे : २९, धंदा : नोकरी व शेती
२) श्रीमती.शहिनाज मेहमूद शेख
वय वर्षे : ५४, धंदा : गृहिणी व शेती
३) श्री.अलिम मेहमूद शेख
वय वर्षे : ३३, धंदा : नोकरी
अ.क्र.१ ते ३ रा.फ्लॅट नं.८, बिल्डींग नं.बी/१३,
प्रबोधन को.हौ.सो.सेक्टर नं.११, खांदा कॉलनी,
नवीन पनवेल (प), जिल्हा : रायगड
४) सौ.रेश्मा मेहबुब शेख
पुर्वाश्रमीची रेश्मा मेहमूद शेख
वय वर्षे : ३७, धंदा : गृहिणी
रा.घर नं.१८२३, श्रीकृष्ण नगर,
कल्याण रोड, अहमदनगर-४१४००१
५) सौ.आसमा अब्दुल शेख
पुर्वाश्रमीची आसमा मेहमूद शेख
वय वर्षे : ३४, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.डी-५, श्री सिद्धी सीएचएस,
सेक्टर नं.७, चारकोप कांदिवली, मुंबई
अ.क्र.२ ते ५ तर्फे कुलमुखत्यारी
अ.क्र.१ श्री.सलीम मेहमूद शेख — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ व ३ आणि ४ व ५ यांनी त्यांचे वडील आणि अर्जदार क्र.२ हिने तिचे पती मेहमूद ईस्माईल शेख यांचे पनवेल येथे दि.०५/०५/२०२१ रोजी निधन झाले. मयत मेहमूद ईस्माईल शेख यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**फ्लॅट नं.८, पहिला मजला, बिल्डींग नं.बी/१३, प्रबोधन को-ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१६, सेक्टर नं.११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (प), जिल्हा : रायगड**

वरील फ्लॅट मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जददार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/०७/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# माणिक जगतापांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनी हजारो कार्यकर्त्यांकडून अभिवादन

**दै.रायगड नगरी । महाड**



रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष माजी आमदार दिवंगत माणिकराव जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिना निमित्त महाड पोलादपूर माणगांव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील हजारो काँग्रेस कार्यकर्ते, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भाजपसह विविध पक्षातील नेते पदाधिकारी यांनी जगताप यांच्या कॅप्टन निवासस्थानी हजेरी लावून स्वर्गीय माणिक जगताप यांना अभिवादन केले.

याप्रसंगी रायगडचे खासदार सुनिल तटकरे, काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, मुळशीचे माजी आमदार शरद ढमाले, राष्ट्रवादीचे नेते सुभाष निकम, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष कृष्णा शिंदे, महाड तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन बंडू शेठ देशमुख, श्रीधर सकपाळ, अमित मोरे, बाळ राऊळ आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी हभप पानसारे महाराज यांचे किर्तन ठेवण्यात आले होते. पानसरे बुवा यांनी आपल्या किर्तनातून माणिक जगताप यांच्या संघर्षयुकत जीवनपट सांगण्याचा प्रयत्न केला.

खा. सुनिल तटकरे यांनी माणिक जगताप यांच्या अकाली निधनाने रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राची मोठी हानी झाली असल्याचे सांगितले. कोणताही राजकिय वारसा नसताना धैर्याने त्यांनी आपले अढळ स्थान महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण केले. विधीमंडळातील त्यांची अभ्यासपूर्ण व मतदार संघातील जनतेच्या प्रश्नांबाबत केलेली प्रभावी भाषणे ही नव्या पिढीसाठी दिपस्तंभा प्रमाणे असतील असे तटकरे यांनी सांगितले. माणिक जगताप यांच्या रुपाने महाडच्या क्रांती भूमीत एक भारदस्त नेतृत्व जन्माला आले होते अखंड मेहनत, कर्तृत्व, जनतेचा जिव्हाळा आणि कार्यकर्त्यांच्या बळावर एक आगळ स्थान त्यांनी निर्माण केले होते. सत्तेच्या प्रवाहाच्या विरोधात जाऊन प्रतिकुल परिस्थितीत आ-पले राजकिय विचार माणिक जगताप यांनी शेवटपर्यत टिकवून ठेवले. पक्षाच्या पलिकडे जावून आबांच्या नावाची एक वोट बँक होती आहे. त्याचमुळे अनेक स्थित्यंतरानंतरही माणिकरावांच्या आठवणींचे कवच मजबूत असल्याने त्यांचे कार्यकर्ते ठाम आहेत. त्यामुळे माणिक जगतापांच्या विचाराचा वारसा पुढे घेऊन जाणार्या स्नेहल व नाना जगताप यांच्या पाठीशी ठामपणे राहणार असल्याचे अश्वासन खा. तटकरे यांनी दिले. महेंद्र घरत यांनी माणिकरावांच्या रुपाने कॉग्रेसला भारदस्त नेतृत्व व वक्तृत्व लाभले होते. केवळ राज्यात नव्हे इतर राज्यांमध्ये त्यांना नेतृत्वाने निरीक्षक म्हणून पाठवले. त्यांच्या अकाली निधनाने जगताप परीवारासह काँग्रेसची मोठी हानी झाली आहे.- जगताप परिवारा सह महाड मतदार संघातील काँग्रेस कार्यकर्त्यांचे पितृछत्र हरवलेय माणिक जगताप यांच्या दूरदृष्टीतील कामे भविष्यात करण्यासाठी एकत्रित काम करायला हवे असे आवाहन त्यांनी केले. मुळशीचे माजी आमदार शरद ढमाले यांनी माणिक जगताप हे स्पष्ट वक्ते होते. स्पष्ट वक्त्याला समस्याही अनेक असतात त्यामुळे माणिकरावांना आपल्या राजकीय जीवनात संघर्ष करावा लागला असे सांगितले. यावेळी सुभाष निकम, कृष्णा शिंदे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

मा.गुन्नाल साहेब

प्रो.जमा.६-२५

**अर्जदाराचे वकील**
**कु.दिपाली रामदास गावंड**
**वकील उच्च न्यायालय**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.६७१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०१/०८/२०२२

१) श्रीमती.गंगाबाई बाबुराव सुरते
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) सौ.अनिता दिलखुश नाईक
पुर्वाश्रमीची कु.अनिता बाबुराव सुरते
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
दोघीही रा.फ्लॅट नं.१०१, गायत्री आवास, प्लॉट नं.१३०,
सेक्टर आर ५, वडघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.बाबुराव शांताराम सुरते हे दि.१४/१०/२०२१ रोजी लिलावती हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर, बांद्रा-मुंबई येथे मयत झाले असून, त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे (वाघिवली वाडा)**
**ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमी संपादन निवाडा क्र. | एकूण संपादीत जमिनीचा तपशिल | | बांधकाम असल्यास त्याचा तपशिल | | दि.०१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णया नुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | दि.०१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णया नुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | बांधकाम बद्दल पुनःस्थानेसाठी वाटप करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकाम धारकाचे नाव | | | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
| ओवळे ६३ | ११६/१० | ०-२३-६ | - | - | २३६०.०० | ३७१.७० | ८ | ९१ | ८७० |
| | ११६/४ | ०-०४-५ | - | - | ४५०.०० | ७०.८८ | | | |
| | १२३/१० | ०-०५-०१ | - | - | ५१०.०० | ८०.३३ | | | |
| | १२३/६ | ०-०२-८ | - | - | २८०.०० | ४४.१० | | | |
| | १२३/६ | ०-०६-०८ | - | - | ६८०.०० | १०७.१० | | | |
| | ८०/३ | ०-१२-१ | - | - | १२१०.०० | १९०.५८ | | | |

कै.बाबुराव शांताराम सुरते यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर काव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५/७/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खोटे लग्न व वारंवार अनैतिक संबध ठेवून रोह्यात तरुणीची फसवणूक ; आरोपी अटक

त्याने रोह्यातील रूममध्ये कोंडून ठेऊन शिवीगाळ, मारहाण व छळ जाच करून मोबाईल फोन व ईमेल द्वारे धमक्या देऊन गुरुवार दि.१४ जुलै रोजी तरुणीच्या घरासमोर येऊन दरवाज्यावर लाथा बुक्याने मारून व तिला जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

दरम्यान पीडित तरुणीच्या संयमाचा बांध फुटल्याने अखेर तिने रोहा पोलीस ठाण्यात. गु.र.नं. व कलम गुन्हा रजि.नं १२५/२०२२ भा.द.वी.क.३७६,३७७,३४२,४२०,४१७,३२३,५०४,५०६ ब अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर व्यक्ती विरोधात तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेऊन त्याला अटक केली आहे.सदर या प्रकरणातबाबत रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद वायंगणकर अधिक तपास करीत आहेत.

## कंपनी आणि कामगार यांचे ऋणानुबंध महत्वाचे : आ.प्रशांत ठाकूर

मिळणार आहेत. या कराराचा ४३ कामगारांना लाभ मिळणार असून त्याबद्दल कामगारांनी संघटना व कंपनीचे आभार मानून आनंद व्यक्त केला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जय भारतीय जनरल कामगार संघटना फार चांगले काम करीत आहे. कंपनी आपल्या कामगारांना सर्व सुविधा देत आहे तर आपण देखील कंपनीला उत्पादन वाढीसाठी मदत केली पाहिजे, हा चांगला उद्देश ठेवून कामगारही काम करत आहेत, त्यामुळे कंपनी आणि कामगारांची उन्नती होत आहे. कंपनी आणि कामगार यांचे ऋणानुबंध महत्वाचे ठरत असून औद्योगिक क्षेत्राच्या हितासाठी उत्तम बाब असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले. संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी या प्रसंगी करारा संदर्भात माहिती देताना सांगितले की, जय भारतीय जनरल कामगार संघटना स्थापन झाल्यानंतर पहिली संघटना हारक्युलस कंपनीत स्थापन झाली. कंपनी व कामगार यांचे संबंध एवढे चांगले आहेत कि गेल्या सहा वर्षांत एकदाही वाद निर्माण झाला नाही. प्रत्येक वेळी कोणताही प्रश्न निर्माण झाला की गुण्या गोविंदाने मार्ग निघतो. कामगार देखील अशाप्रकारे काम करतात की कंपनीला कधीच नाव ठेवायला जागा नसते. त्यामुळे कंपनी आणि कामगारांचा आदर्श उद्योग क्षेत्रासाठी लाभदायक आहे, असेही घरत यांनी नमूद केले.

## शिक्षणदानाचे काम महत्वपूर्ण : वर्षा ठाकूर

प्रतिनिधी उपाध्यक्ष जयंत पाटील पालक प्रतिनिधी सचिव के. साधना, प्रशांत मोरे, संध्या अय्यर यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत गुरुमुळे आयुष्यातील अज्ञानाचा अंध:कार दूर होतो, त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात एक गुरु असावा. असे सांगितले. संजय पाटील यांनी, आपल्याला गुरुचे महत्व समजावे यासाठी आपण प्रत्येकवर्षी गुरुपौर्णिमा साजरी करतो. गुरुमुळे आपल्यावर चांगले संस्कार होतात आणि या संस्कारांची शिदोरी घेऊन आपण समाजात ताठ मानेने जगू शकतो, असे सांगत गुरुचे महत्व विशद केले. दरम्यान, कला चिल्ड्रन अकॅडमीतर्फे या कार्यक्रमाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांबरोबर ॲक्टिव्ह टीचर, ॲक्टिव्ह प्रिन्सिपल, ॲक्टिव्ह आर्ट टीचर तसेच ॲक्टिव्ह स्कूल अवॉर्डचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान गुरु शिष्याचा महिमा वर्णन करण्यासाठी स्नेहल कडव यांच्या मार्गदर्शनाखाली नृत्याविष्कार सादर करण्यात आला.

## दारू पिऊन एसटी चालवाल तर ; चालकासह आगारप्रमुखही दोषी

प्राशन केले आहे का ? याची जबाबदारी आगरप्रमुख यांची असणार आहे. यापुढे चालकाची तपासणी केल्याशिवाय बस ताब्यात दिली जाणार नाही. बस त्याब्यात देण्या आधी चालकाने मद्यप्राशन केले की नाही याची तपासणी आगार प्रमुखांनी करण्याचे आदेशच महाव्यवस्थापकांनी दिले आहेत. त्यानुसार चालकांची होणाऱ्या तपासणी साठी स्वतंत्र रजिस्टर मध्ये नोंद ठेवली जाणार आहे. अपघात टाळण्यासाठी एसटी बस चालकाने मद्यप्राशन केले नाही, याची खात्री केल्यानंतरच बस त्याच्या ताब्यात द्यावी, असे आदेश एसटीच्या वाहतूक विभाग महाव्यवस्थापकांनी आगार प्रमुखांना दिले आहेत. त्याअनुषंगाने लेखी पत्रच राज्यांतील सर्व आगरप्रमुखांना देण्यात आले आहे. यापुढे दारू पिऊन एसटी चालकांनी बस चालवली तर आगरप्रमुखांना देखील दोषी धरले जाणार असून कठोर कारवाई ही केली जाणार आहे.

## पुढील आठवड्यात पनवेलमध्ये प्रदेश कार्यकारिणीची बैठक

माजी महापौर डॉक्टर कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, चारुशिला घरत, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, जिल्हा सरचिटणीस श्रीनंद पटवर्धन, दीपक बेहेरे, भाजपचे पनवेल शहराध्यक्ष जयंत पगडे, युवामोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते. यावेळी आमदार रविंद्र चव्हाण, प्रशांत ठाकूर आणि श्रीकांत भारतीय यांनी प्रदेश कार्यकारणीच्या बैठकीच्या पार्श्वभुमीवर भाजपच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून सूचना केल्या.. दरम्यान वेळी विधान परिषदेचे नवनिर्वाचीत आमदार श्रीकांत भारतीय यांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## शिवसैनिकांवर हल्ला, उद्धव ठाकरे भडकले, पोलिसांना झापले

पडू नये. आमच्या राजकारणात तुम्ही लक्ष घालू नका. आम्ही लढू, पण माझ्या सैनिकांच्या जीवावर बेतत असेल तर शांत बसणार नाही. काही झालं तर या सगळ्याला तुम्ही जबाबदार असाल, असं उद्धव ठाकरे पोलिसांना उद्देशून म्हणाले.

कुणाचं रक्त सांडू नये म्हणून आम्ही सगळे जण शिवसैनिक शांततेचं आवाहन करतोय. पण सध्या सुरु असलेलं राजकारण हे सूडाचं आहे. आम्ही हे राजकारण खपवून घेणार नाही. हल्ला झालेल्या शिवसैनिकांना तुम्ही सुरक्षा पुरवा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी पोलिसांकडे केली. तुम्हाला जर जमत नसेल तर सांगा, हात वर करा, शिवसैनिक रक्षण करायला समर्थ आहे, असंही उद्धव ठाकरे म्हणाले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं नाव न घेता त्यांना टोला लगावला. आपल्याकडे कर्तेकरविते उपमुख्यमंत्री आहेत. आपल्यावरील अन्याय त्यांना जाऊन सांगूया. त्यांनीही जर सांगितलं की आम्हाला संरक्षण करणं जमत नाही तर मग आपलं संरक्षण करण्याला आपण शिवसैनिक समर्थ आहोत, असंही उद्धव म्हणाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पनवेलच्या फडके नाट्यगृहात प्रसिद्ध नकलाकार स्व.कमलाकर वैशंपायन यांच्या तैलचित्राचे अनावरण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल नगरीचे स्थानिक व जेष्ठ नकलाकार, अभिनेते स्व. कमलाकर वैशंपायन यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज (शुक्रवार दि.१५ जुलै) शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील दर्शनी भागात स्व.कमलाकर वैशंपायन यांच्या तैलचित्राचे अनावरण करण्यात आले. याबाबत मराठी सिनेसृष्टीतील नकलाकार, विनोदी अभिनेते, सिने- नाट्यकलाकार, गायक, वादक, तंत्रज्ञ यांच्यासाह तमाम कलाकारांच्या वतीने पाठपुरावा करण्यात आला होता. या मागणीबाबत ठराव मंजूर करून पनवेल महापालिकेने सकारात्मकता दर्शवली असून शुक्रवारी स्व. कमलाकर वैशंपायन यांच्या स्मृतिदिनी कलाकार आणि राजकीय नेतेमंडळींच्या उपस्थितीत तैलचित्राचे अनावरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

कमलाकर वैशंपायन हे नकलाकारांमधील एक मोठे नाव आहे. त्यांनी गेली ५५ वर्षे केवळ महाराष्ट्रातच नव्हे; तर देश परदेशात जाऊन लोकांना हसवून नावलौकिक मिळवला आहे. 'हसरा गजरा' या सुप्रसिद्ध कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी तमाम रसिकजनांच्या हृदयावर राज्य केले. या कार्यक्रमाचे जवळजवळ दहा हजाराहुन अधिक प्रयोग झाले आहेत. मराठी सह हिंदी स्टँडअप कॉमेडीअन म्हणून देखील त्यांनी रंगभूमीची सेवा केली. अनेक मालिकांच्या माध्यमातुन त्यांनी स्व. अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत दूरदर्शनवर काम केले आहे.

फडके नाट्यगृहात तैलचित्राच्या अनावरण कार्यक्रमाप्रसंगी माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी महापौर डॉ.कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीता पाटील, साई संस्थान वहाळचे रविशेठ पाटील, सर्व नगरसेवक, नगरसेविका, राजकीय नेतेमंडळी, कलाकार श्रीकांत मुंबईकर, डी महेश, जॉनी रावत, गजानन नार्वेकर, दिलीप खन्ना यांच्यासह दिग्गज कलाकार तसेच मान्यवर उपस्थित होते. तर माजी पालकमंत्री रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर यांनीही उपस्थित राहून तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण मोहकर व परेश दाभोळकर यांनी केले.

पनवेल मनपाने स्व कमलाकर वैशंपायन यांचे तैलचित्र फडके नाट्यगृहात लावण्याचा निर्णय घेतल्याबद्दल सुप्रसिद्ध विनोदी अभिनेते जॉनी लिव्हर, पार्श्वगायक तथा मिमिक्री कलाकार सुदेश भोसले, राजीव श्रीवास्तव, स्टँडअप कॉमेडिअन सुनील पाल, जिमी मोसेस, व्हीआयपी, जॉनी रावत यांच्यासह आदी कलाकारांनी व्हिडीओ स्वरूपात शुभेच्छा देऊन स्व. नकलाकार/अभिनेते कमलाकर वैशंपायन यांच्याविषयी प्रेम व्यक्त केले.

मिमिक्री आर्टिस्ट असोसिएशन मुंबईचे (माम) सर्वेसर्वा जॉनी लिव्हर, सुदेश भोसले, कपिल शर्मा आदी कलाकारांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. भविष्यामध्ये नवनवीन नकलाकार तयार व्हावेत आणि त्यांना प्रेरणा मिळावी यासाठी हे तैलचित्र नेहमीच प्रोत्साहन देत राहील. हीच आशा मनात ठेवून हे तैलचित्र या नाट्यगृहात लावले असल्याची भावना यावेळी उपस्थित कलाकारांनी व्यक्त केली. तसेच पनवेलच्या स्थानिक कलावंतांचा सन्मान केल्याबद्दल पनवेल मनपा आणि या निर्णयासाठी हातभार लावलेल्या नेतेमंडळींसाठी जॉनी लिव्हर, कपिल शर्मा यांच्यासह सर्व दिग्गज कलाकार विनाशुल्क येऊन कार्यक्रम करतील अशी ग्वाही 'माम' चे प्रवक्ते डी महेश यांनी दिली.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून सुप्रसिद्ध डॉ. गिरीश गुणे यांचे अभिष्टचिंतन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलकरांसाठी अविरत सेवा देणारे सुप्रसिद्ध डॉक्टर गिरीश गुणे यांचा वाढदिवस शुक्रवारी साजरा झाला.

त्यानिमीत्त डॉक्टर गिरीश गुणे यांचे शालेय जीवनातील गुरु माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गिरीश गुणे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांना शाल, श्रीफल व पुष्पगुच्छ देऊन निरोगी जीवनासाठी शुभेच्छा देत अभिष्टचिंतन केले.

यावेळी पत्रकारांच्या वतीने केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार गणेश कोळी, कुणाल लोंढे, वैभग गायकर, सुमंत नलावडे, छायाचित्रकार लक्ष्मण ठाकूर, राजेश डांगळे, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



# दुकानातून सामान घेऊन येतो असे बोलून गेलेला १६ वर्षीय मुलगा बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानातून सामान घेऊन येतो असे बोलून घरातून निघून गेलेला १६ वर्षीय राहुलकुमार सुधीर मंडल याचे अपहरण केल्याचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

त्याची उंची अंदाजे चार फूट असून तो अंगाने सडपातळ आहे. त्याचा रंग काळा, चेहरा गोल, दोन्ही पाय वाकडे असून अंगात लाल रंगाचा हाफ टी-शर्ट व निळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातली आहे. त्याला हिंदी भाषा बोलता येते. या मुलाबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे यांच्याशी संपर्क साधावा.

# विहिरीत मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील धोबी आळी आझाद बेकरीच्या बाजूला असलेल्या विहिरीत एका २२ वर्षे तरुणाचा मृतदेह सापडून आला आहे. दुर्गेश शरद तळेकर असे या तरुणाचे नाव आहे. वाणी आळी- धोबी आळी जवळील आझाद बेकरीच्या बाजूला असलेल्या विहिरीत दुर्गेश तळेकर यांचा मृतदेह पनवेल शहर पोलिसांना सापडून आला. याची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

---

मा.श्री.सोनावणे सा़ो

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.हर्षदा सुनील गडकर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.६६२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०८/०९/२०२२

१) श्रीमती.फरीदा फिरोज सोलंकी
वय वर्षे : ४१, धंदा : गृहिणी
२) तौसीफ फिरोज सोलंकी
वय वर्षे : २३, धंदा : शिक्षण
३) अलफिया फिरोज सोलंकी
वय वर्षे : १८, धंदा : शिक्षण
४) मोहमद हुसैन फिरोज सोलंकी
वय वर्षे : १०, धंदा : शिक्षण
तर्फे अज्ञानपालनकर्ती आई
अ.क्र.१ ते ४ सर्व रा.फ्लॅट नं.३०२,
प्लॉट नं.२७२, २७२/१, २७२/२,
प्रभाकर निवास बिल्डींग, ओंकारेश्वर
मंदिराजवळ, बंदर रोड, पनवेल, जि.रायगड
५) अमिना अब्दुल रज्जाक सोलंकी
वय वर्षे : ६२, धंदा : गृहिणी
रा.लियाकत आळी चाळ, आझाद नगर,
घाटकोपर, मुंबई-८६,
सध्या रा.फ्लॅट नं.३०२, प्रभाकर निवास
बिल्डींग, ओंकारेश्वर मंदिराजवळ, बंदर रोड
पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ हिचे पती, अर्जदार क्र.२ ते ४ चे वडील आणि अर्जदार क्र.५ चा मुलगा मोहम्मद फिरोज अब्दुल रज्जाक सोलंकी उर्फ फिरोज रजाक सोलंकी यांचे तारीख ०७/०६/२०२० रोजी पनवेल येथे निधन झाले. मयत मोहम्मद फिरोज अब्दुल रज्जाक सोलंकी उर्फ फिरोज रजाक सोलंकी यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**शॉप नं.१७, क्षेत्र २४० चौ.फूट बिल्ट-अप, तळ मजला, हरी मधुर मिलन को.ऑप.हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं.४१, सेक्टर नं.५, नवीन पनवेल (पु.), जिल्हा : रायगड या वाणिज्य वापराच्या दुकान गाळ्यातील निम्मा अविभक्त मालकी हक्क-हिस्सा ही मिळकत**

वरील स्थावर व घर मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०८ माहे ०७ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

**वकील : श्री.आर.टी.खापरे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (व.स्तर) (मुजावर साहेब) यांचे न्यायालयात पनवेल

चौ.अर्ज क्र.८४०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०७/२०२२

श्रीमती.पुष्पा राजन
रा.ई/३, मंजुलिका अपार्टमेंट,
प्लॉट नं.२८, सेक्टर २, अबोट हॉटेलसमोर,
वाशी, नवी मुंबई-४००७०३ — अर्जदार

विरुद्ध

१) श्री.रोशन राजन
रा.ई/३, मंजुलिका अपार्टमेंट,
प्लॉट नं.२८, सेक्टर २, अबोट हॉटेलसमोर,
वाशी, नवी मुंबई-४००७०३
२) कुमारी.रेश्मा राजन
रा.ई/३, मंजुलिका अपार्टमेंट,
प्लॉट नं.२८, सेक्टर २, अबोट हॉटेलसमोर,
वाशी, नवी मुंबई-४००७०३ — सामनेवाले

वरील अर्जदार यांचे पती श्री.के.एन.राजन, यांचे दि.०५/०२/२०२१ रोजी वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले. तरी मयत श्री.के.एन.राजन यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

a) All being Half (1/2) Share of the Residential Premises, bearing Flat No.304, on the Third Floor, admeasuring 32.0915 sq. mtrs. Carpet area alongwith 2.2050 sq. mtrs. Terrace or thereabouts, in the Building Known as "OM SAI HEIGHTS", situtated on Plot No.A-59, in Sector No.16, at Ulwe, Navi Mumbai, Taluka Panvel & District Raigad, within the limits of Panvel Municipal Corporation.

b) Proportionate Share, i.e. 1/10 th Share, in respect of Ancestral Property, being 6 Are 55 Sq. Mtrs of dry landed Property comprised in Old Survey No.252/16, and Resurvey Block No.84, Re-Survey No.3, under Thandaper No.2364, situated in Vazhappally East Village, as per Sale Deed No.2026/1955, of SRO, Chaganacherry and Registration Receipt No.2778/1955, of SRO, Chaganacherry, District Kottayam, in the State of Kerala.

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज केलेला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत / हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५ माहे जुलै सन २०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

मे.सोनावणे साहेब कोर्ट

**ॲड.तृप्ती ग. पाटील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८७४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०९/२०२२

कै.कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा (मयत तर्फे वारस)
१) श्रीमती.सुशिला कमलेश्वरनाथ मिश्रा, वय : ७५ वर्षे
२) श्री.कृपेश कमलेश्वरनाथ मिश्रा, वय : ५१ वर्षे
वरील क्र.१ व २ रा.अशोका गार्डन, बी १/९,
देशमुख लाईन, एम.पी.रोड, ता.पनवेल, जि.रायगड
३) तृपेश कमलेश्वरनाथ मिश्रा (मयत तर्फे वारस)
३/१) पुजा तृपेश मिश्रा, वय : ३७ वर्षे
३/२) खुशी तृपेश मिश्रा, वय : १४ वर्षे
रा.वेवुर, हनुमान टेकडी, जांभूळ पाडा,
जीवन ज्योत हॉस्पिटल जवळ, ता.पालघर, जि.ठाणे
४) संगीता उर्फ रश्मी परेश शुक्ला (मयत तर्फे वारस)
४/१) कु.अंश परेश शुक्ला तर्फे
अ.पा.क.परेश कालीशंकर शुक्ला (वडील)
रा.रुम नं.८७/अे, शांती नगर, एम.जी.रोड,
एस.टी.डेपो मागे, बोरीवली पूर्व, मुंबई
५) सौ.कल्पना नयन मयेकर, वय : ४६ वर्षे
रा.जी-५, कस्तुरी २, को.ऑप.हौ.सोसा.,
प्लॉट नं.४५६, तक्का, नॅशनल पॅराडाईजच्या
मागे, पनवेल, ता.पनवेल — अर्जदार

**अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ च्या (VIII) प्रमाणे, वारस दाखला मिळणेकरिता रक्कम रु.१०,२५,०००/-**

मे.कोर्टास अर्जदार तर्फे अर्ज विनंतीपूर्वक असा की,

१) सदरहू अर्जदार ह्यांनी सदरचा चौकशी अर्ज मयत कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा ह्यांचे वारस म्हणन नोंद होणेकरिता व वारस दाखला मिळणेकरिता मे.कोर्टापुढे दाखल केलेला आहे.

२) सदरहू कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा हे दि.१९/१०/२०१७ रोजी मु.वाशी येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्र.१ ही मयत कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा यांची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र.२ व ३ ही मुले आहेत. तसेच अर्जदार क्र.४ व ५ ह्या मुली आहेत. मयत कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा यांचा मुलगा अर्जदार क्र.३ तृपेश कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा व मुलगी अर्जदार क्र.४ संगीता उर्फ रश्मी परेश शुक्ला हे मयत झाले असून त्यांचे वारसांना याकामी पक्षकार केलेले आहे.

३) अर्जदार यांची आजी म्हणजेच मयत कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा यांची आई कै.सुखरानी देवी भगवतीस्वरुप मिश्रा या दि.०१/०३/२००५ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार यांचे वडील कै.कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा यांचे पश्चात तांत्रिक बाबींची अडचण उपस्थित होवू नये म्हणून मयताचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांचे नाव मिळकतीवर नोंद होणेकरिता अर्जदार सदरचा अर्ज दाखल करीत आहेत.

४) अर्जात उल्लेखित मिळकती या मृत्यूसमयी अर्जदार यांचे वडील कै.कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा यांचे नावे होत्या व आहेत. त्या पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**कै.कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा यांच्या मिळकती**

| | |
|---|---|
| **१) नील संस्कृती, प्लॉट नं.४५, ४६, ४७, ४८ सेक्टर ९, शोरुम क्र.१७, तळमजला, नवीन पनवेल, १२६.५४८ स्क्वेअर फुट, कारपेट १४.१० स्क्वेअर मीटर (बिल्टअप) ता.पनवेल, जि.रायगड** | **पवल १९२/२००६ दि.६/१/२००६ रोजीचा** AGREEMENT FOR SALE |
| **२) अशोका गार्डन, देशमुख लाईन, फ्लॅट नं.९, बी विंग, बी १, सहावा मजला, कारपेट ७७४ स्क्वेअर फुट ता.पनवेल, जि.रायगड** | **पवल १४८७/२००४ दि.४/३/२००६ रोजीचा** AGREEMENT OF SALE |

येणेप्रमाणे मयत कै.कमलेश्वरनाथ भगवतीस्वरुप मिश्रा यांच्या नावे मिळकती आहेत.

सबब मयत व्यक्तीच्या पश्चात अर्जदार ह्यांची कायदेशीर वारस म्हणून नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. येणेप्रमाणे जमीन मिळकती असून वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

ही नोटीस आज दि.१५ जुलै २०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

---

मे.गोडसे मॅडम कोर्ट

**ॲड.तृप्ती ग. पाटील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ/वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५९३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०३/०८/२०२२

कै.धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी (मयत) तर्फे वारस
१) श्री.जनार्दन धोंड्या उर्फ धोंडू कोळी, वय : ६६ वर्षे
रा.मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.हरिश्चंद्र धोंड्या उर्फ धोंडू कोळी, वय : ६१ वर्षे
रा.जोसेफ व्हिल, बिल्डींग नं.८, २ रा मजला,
कामगार वसाहत, ता.उरण, जि.रायगड
३) कै.विठाबाई मनोहर कोळी (मयत) तर्फे वारस
३/१) श्री.गजानन मनोहर कोळी, वय : ६१ वर्षे
३/२) श्री.किशोर मनोहर कोळी, वय : ५१ वर्षे
३/३) श्री.राजेंद्र मनोहर कोळी, वय : ४९ वर्षे
३/४) श्री.भास्कर मनोहर कोळी, वय : ४६ वर्षे
३/५) शारदा मनोहर कोळी, वय : ४५ वर्षे
३/६) रजनीगंधा मनोहर कोळी, वय : ४२ वर्षे
वरील क्र.३/१ ते ३/६
रा.मु.पो.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड
३/७) राजश्री शेखर पाटील, वय : ४४ वर्षे
रा.रुम नं.३, पाटील हाऊस, एल.बी.एस रोड,
बडवाईक हॉस्पिटल जवळ, भांडूप (प.)
४) कै.प्रज्ञा देविदास पाटील (मयत) तर्फे वारस
४/१) कु.प्राची देविदास पाटील, वय : २६ वर्षे
४/२) कु.प्रथमेश देविदास पाटील, वय : २३ वर्षे
४/३) प्रणाली देविदास पाटील, वय : २१ वर्षे
वरील क्र.४/१ ते ४/३ रा.प्रथमेश निवास,
गुलमोहर सोसायटी, विद्यानगर, तांत्रिक विद्यालय,
वरसोली, ता.अलिबाग, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कै.पांडुरंग धोंड्या उर्फ धोंडू कोळी (मयत) तर्फे वारस
१) श्रीमती.लता पांडुरंग कोळी, वय : ६३ वर्षे
२) सौ.कल्याणी विशाल होतकर, वय : वर्षे
वरील सामनेवाले क्र.१ व २ रा.अे १०, दत्तात्रय
सोसायटी, मिठबंदर रोड, ठाणे (पुर्व) — सामनेवाले

**अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ च्या (VIII) प्रमाणे, वारस दाखला मिळणेकरिता रक्कम रु.३,२००/-**

मे.कोर्टास अर्जदार तर्फे अर्ज विनंतीपूर्वक असा की,

१) अर्जदार यांनी सदरचा दिवाणी चौकशी अर्ज वारसदाखला मिळणेकरिता मे.कोर्टात दाखल केला आहे. सिडको मुल्यांकन पत्राप्रमाणे या अर्जाचे मुल्यांकन केलेले आहे.

२) अर्जदार व सामनेवाला हे मयत धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी हे दि.१६/०३/२०११ रोजी मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हे मयत कै.धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांची मुले आहेत व सामनेवाले ही मयत कै.धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांचा मुलगा मयत पांडुरंग धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांचे वारस आहेत. पांडुरंग धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी हे दि.१६/१२/२०१६ रोजी ठाणे येथे मयत झालेले आहेत. तसेच मयत कै.धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांची पत्नी कै.राधुबाई धोंडू कोळी ह्या दि.९/१२/२००३ रोजी मयत झालेल्या आहेत. अर्जदार व मयत पांडुरंग धोंड्या उर्फ धोंडू कोळी हे मयत धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे. परंतु पांडुरंग धोंड्या उर्फ धोंडू कोळी हे मयत झाल्याने त्यांचे वारसांना या अर्जामध्ये सामनेवाला म्हणून पक्षकार केलेले आहे.

३) सदर अर्जदार व सामनेवाले हे मयत व्यक्तींचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार ह्यांचे मयत वडील धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांचे पश्चात तांत्रिक बाबींची अडचण उपस्थित होवू नये म्हणून मयताचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार व सामनेवाले यांचे नाव सर्व मिळकतीवर महसूल दप्तरी, सिडको कार्यालय व जेथे आवश्यक आहे तेथे नोंद होणेकरिता सदरचा अर्ज दाखल करीत आहेत.

४) सदरहू अर्जदार यांचे मयत वडील धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी ह्यांचे मृत्यूसमयी त्यांच्या नावाची नोंद असणाऱ्या खालील वर्णनाच्या काही जमीन मिळकती ह्या सरकारतर्फे सिडकोने नवी मुंबई योजनेकरिता भूसंपादन केलेल्या आहेत. त्या जमिनीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**जमीन मिळकतींचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | ३३१ | ३८५ | ३ | ०-२०-२ |

कै.धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांच्या नावे भूसंपादीत झालेल्या मिळकतीतून भूखंड दिले आहेत. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| संचिका क्र. | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १८४ | उलवे-१ डी | ९ | १२५ | २०० |

अर्जातील मिळकती ह्या नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादन झालेवर त्यांचे नावे ॲवॉर्ड झाले आहेत. संपादन हे मयताचे नावे आहेत. तसेच या मिळकतीच्या मोबदल्यात त्यांना १२.५% टक्के भूखंड मिळणार आहेत. उपरोक्त मयत व्यक्तीच्या नावे शासनाने नवी मुंबई योजनेंतर्गत संपादीत केलेल्या जमीन मिळकतीचे ॲवॉर्ड झालेले आहे. सदरचे ॲवॉर्ड अर्जदार यांचे मयत वडील धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांचे नावाने झालेले आहेत. अर्जदार व सामनेवाले ह्यांचे वडील हे मयत धोंड्या उर्फ धोंडू कोल्या कोळी यांचे मुले आहेत. सबब मयत व्यक्तीच्या पश्चात अर्जदार ह्यांची कायदेशीर वारस म्हणून नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे.

येणेप्रमाणे जमीन मिळकती असून वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

ही नोटीस आज दि.०४/०७/२०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/-<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/-<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# संक्षिप्त...

## दुकानातून सामान घेऊन येतो असे बोलून गेलेला १६ वर्षीय मुलगा बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानातून सामान घेऊन येतो असे बोलून घरातून निघून गेलेला १६ वर्षीय राहुलकुमार सुधीर मंडल याचे अपहरण केल्याचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

त्याची उंची अंदाजे चार फूट असून तो अंगाने सडपातळ आहे. त्याचा रंग काळा, चेहरा गोल, दोन्ही पाय वाकडे असून अंगात लाल रंगाचा हाफ टी-शर्ट व निळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातली आहे. त्याला हिंदी भाषा बोलता येते. या मुलाबाबत अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेटे यांच्याशी संपर्क साधावा.

## १० प्रवाशांचे जीव धोक्यात घालणाऱ्या बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१० प्रवाश्यांचे जीव धोक्यात घालून बस रोडवरील पाण्यात चालवून ती पाण्यात बंद पाडण्यास कारणीभूत झाला म्हणून एका बस चालकाविरुद्ध पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टाटा मॅक्रो पोलो बस क्रमांक एमएच ४६ बीयु १७२९ वरील चालक मोहम्मद रफिक खान (वय ५७ वर्षे) याने त्याच्या ताब्यातील गाडीतून १० प्रवासी घेऊन खारपाडा शिवमंदिर ते आपटा जाणाऱ्या रस्त्यावर नदीच्या पुराचे पाणी रस्त्यावर आलेले असताना तेथे कर्तव्यास असलेल्या अधिकाऱ्यांनी त्यास सदर रोडवरून बस चालवण्यास मनाई करून इंसिडेन्ट कमांडर तथा तहसीलदार पनवेल यांच्याकडील लेखी नोटीस बजावीत असताना त्याने न स्विकारत रस्त्याच्या पलीकडे दुर्लक्ष करून सदर बस चालवून रस्त्यावर आलेल्या नदीच्या पुराच्या पाण्यात घालून स्वतःचे तसेच बस मधील एकूण १० प्रवासी यांचा जीव धोक्यात घालून बस पाण्यात चालवून ती पाण्यातच बंद पडल्याने त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# शाडूच्या गणेश मुर्तीची कला जिवंत ठेवणारे चिरनेरचे कलानगर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

यावर्षी श्रावण महिन्यातील पहिला सण नागपंचमी मंगळवार दि २ऑगस्ट रोजी येत असल्याने नागाच्या मुर्ती घडवून त्यांना रंगकाम देण्यास चिरनेर येथील महिला कारागीरांची लगबग सुरू झाली आहे. तसेच महत्वाचा समजला जाणारा श्री गणेश चतुर्थी उत्सव बुधवार दि ३१ ऑगस्ट रोजी येत असल्याने चिरनेर कलानगर मधिल मुर्तीकारांनी शाडूच्या मातीच्या गणेशमूर्ती घडवीण्यास सुरुवात केल्याचे चित्र कलानगरात पहावयास मिळत आहे.



पेणच्या गणेशमूर्ती कलेला तोडीस तोड देणारे चिरनेर कलानगरातील २२ कुंभार समाजाचे कूंटुब सुमारे ६५ वर्षा पासून माती बरोबर शाडूच्या मातीच्या गणेशमूर्ती घडवीण्याचे काम करत आहेत. कुंभार समाजाला शेती नसल्याने आपल्या कलेच्या पाठबळावर उन्हाळ्यात मातीची भांडी आणि पावसाळ्यात नागाच्या मुर्ती व गणेशमूर्ती, नवरात्रोत्सवात दुर्गामातेच्या मुर्ती घडवून कुंभार समाजाचे बांधव आप आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहेत. सध्या चिरनेर कलानगर मधिल गजानन चौलकर, प्रसाद चौलकर, नंदकुमार चिरनेरकर, रमेश म्हशीलकर, दामु आण्णा चौलकर, प्रकाश चिरनेरकर, नारायण चौलकर, भालचंद्र हातनोलकर, विष्णू चौलकर, विलास हातनोलकर, रंगनाथ चौलकर, भाई चौलकर, दिपक गोरे, नरेश हातनोलकर, नारायण हातनोकर या कलाकारांनी प्लॅंस्टर ऑफ पॅरिसच्या मुर्ती न घडविता पर्यावरण मुक्त करणाऱ्या शाडूच्या मातीच्या मूर्ती घडविण्याच्या कामांना प्राधान्य दिल्याचे चित्र कलानगरात पहावयास मिळत आहे.

## सीकेटी विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे श्रध्दास्थान स्वर्गीय चांगू काना ठाकूर यांच्या पुण्यतिथी निमित्त नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्याचा गुणगौरव करण्यात आला. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, महात्मा फुले कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर गणेश ठाकूर, सचिव डॉक्टर एस. टी. गडदे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, समीर ठाकूर, प्रकाश बिनेदार, मनोज भुजबळ, माजी प्रभाग समिती सभापती वृषाली वाघमारे, सुशीला घरत, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, शाळा समिती सदस्य जे. वाय बावडे, बी. एस. भोईर, छायाताई ठाकूर, हरचंद्रसिंग सग्गू, जयराम मुंबईकर, चांगू काना ठाकूर विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक कैलास मंत्रे, संतोष चव्हाण, अजित सोनावणे, प्रशांत मोरे, अनुराधा कोल्हे यांच्यासह शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या पुण्यतिथी कार्यक्रमाच्या निमित्ताने मान्यवरांच्या हस्ते दहावी आणि बारावीच्या परीक्षेत विशेष यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्याचा पारितोषिक रक्कम व सन्मान चिन्ह देवून विशेष गुणगौरव करण्यात आला. या उपस्थित मान्यवरांनी चांगू काना ठाकूर साहेबांच्या स्मृतींना उजाला दिला तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### अमित कातकरीला मिळाला जातीचा दाखला..!

## जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील कातकरी उत्थान अभियानाची फलश्रुती

**दै.रायगड नगरी। अलिबाग**

उरण तालुक्यातील सातघर कातकरीवाडी येथील अमित अमृत कातकरी या विद्यार्थ्याला औद्योगिक तंत्रशिक्षण संस्थेत (ITI) मध्ये प्रवेश हवा होता. परंतू त्याच्याकडे जातीचा दाखला नसल्याने त्याच्या आयटीआयमधील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यास तांत्रिक अडथळा येत होता. ही बाब प्रा.राजेंद्र मढवी यांना समजल्यावर त्यांनी उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे आणि नायब तहसिलदार नरेश पेडवी यांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अमितचा अर्ज स्वतः भरून दिला. त्या अर्जावर चानजे ग्रामपंचायतीचे तलाठी तेजस चोरगे, मंडल अधिकारी श्री.भंडारी अन् आदिवासी विकास निरीक्षक पांढरे यांच्या स्वाक्षरीसह आवश्यक ते अभिप्राय घेतले.

सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून अमितचा हा अर्ज सेतू कार्यालयात ऑनलाईन प्रक्रियेसाठी सादर करण्यात आला. तेथे सेतू कार्यालयातील श्रीमती शरयू यांनी ऑनलाईन प्राथमिक कार्यवाही पूर्ण केली. तहसील कार्यालयातील लिपिक श्रीमती सोनिया आणि श्री.गिरी यांनीही अमितचा अर्ज ऑनलाईन तपासून पुढील कार्यवाहीसाठी तहसिलदार अंधारे यांच्याकडे तातडीने पाठविला.

एका विद्यार्थ्याच्या तोही कातकरी समाजातील.. त्याच्या पुढील शिक्षणाच्या



प्रवेशासंबंधीची अडचण कर्तव्यतत्पर, संवेदनशील तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी लक्षात घेतली. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांना कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्रीच्या माध्यमातून कातकरी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यास वेळोवेळी प्रोत्साहन देत असतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील आदिवासी बांधवांसाठी, कातकरी उत्थानासाठी तालुकास्तरावर दाखले वाटप मेळावे, आरोग्य शिबिरे, वन हक्क दाखले वाटप असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल उपविभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात आलेल्या अमित कातकरीच्या अर्जास न्याय मिळाला नसता तर नवलच..

एक प्रामाणिक, कार्यतत्पर अधिकारी अशी ओळख असलेले पनवेल उपविभागीय अधिकारी मुंडके यांनीदेखील अमितच्या अर्जास तात्काळ ऑनलाईन मंजूरी देवून अमितला जातीचा दाखला मिळवून दिला.

विशेष म्हणजे ही संपूर्ण कार्यवाही फक्त एका दिवसात पूर्ण करण्यात आली. त्यामुळे अमित अमृत कातकरी या विद्यार्थ्याचा आयटीआय मधील प्रवेश सुकर झाला. हा जातीचा दाखला पनवेल उपविभागीय राहुल मुंडके यांच्या हस्ते आणि उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, आदिवासी मित्र प्रा.राजेंद्र मढवी, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांच्या उपस्थितीत अमितला देण्यात आला.

अमित अमृत कातकरी या कातकरी समाजातील विद्यार्थ्याला आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटायझेशनचा प्रभावी वापर आणि सामान्य जनतेप्रती संवेदनशिलता या सर्वांच्या संगमातून मिळालेला जातीचा दाखला हे सर्व शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी एक आदर्श आणि प्रेरणादायी उदाहरण ठरेल, यात शंकाच नाही.

## रूम न देता केली वीस लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रूम न देता २० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी भूपेंद्र चिंतामण पाटील (वय ४० रा.बोकडवीरा, उरण) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हरिग्राम, बेलेजा सोसायटी येथे राहणाऱ्या हर्षीला खंडागळे यांच्या पतीच्या ओळखीचे बांधकाम विकासक भूपेंद्र चिंतामण पाटील हे त्यांच्या घरी आले. व उरण येथील चालू असलेल्या बांधकामात कमी किमतीत घर देतो असे सांगून रूम बुक करण्यासाठी सांगितले. यावेळी भूपेंद्र पाटील यांना नवीन पनवेल येथे भेटून उरण येथील मौजे म्हातावली येथे बिल्डिंगचे काम ३० महिन्यांमध्ये पूर्ण करून पझेशन देणार असल्याचे सांगितले. यावेळी बांधकाम विकासक भूपेंद्र पाटील यांना दहा लाख रुपये देण्यात आले. व करारपत्र, नोटरी करण्यात आली. मात्र भूपेंद्र पाटील यांनी ३० महिन्यांमध्ये रूमचा ताबा न दिल्यामुळे व पैसे परत न केल्यामुळे भूपेंद्र पाटील यांनी उरण येथील आनंदनगर या बांधकाम साइटवर तीस लाखात दुसरा रूम सहा महिन्यांमध्ये देतो असे सांगितले. त्यामुळे आणखी दहा लाख रुपये खंडागळे यांनी दिले. भूपेंद्र पाटील यांनी आनंदनगर, उरण येथील बांधकाम पूर्ण केले. मात्र खंडागळे यांनी बुक केलेला रूम दुसऱ्या व्यक्तीला विकला. यावेळी त्यांच्याकडे रूम मागितला असता त्यांनी रूम दिलेला नाही. व पैसे परत मागून देखील पाटील यांनी पैसे परत दिले नाहीत. त्यामुळे वीस लाख रुपये घेऊन रूम न देता फसवणूक केल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात भूपेंद्र पाटील यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन संस्थेमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**

येथील राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तिकरण संस्था, प्रादेशिक केंद्र नवी मुंबई संस्थेमध्ये १३ जुलै २०२२ रोजी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी करुणा यादव शिक्षणाधिकारी नवी मुंबई महानगरपालिका व संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह याच्या हस्ते ८२ बौद्धिक दिव्यांगजन मुलाना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. करुणा यादव शिक्षणाधिकारी यांनी बौद्धिक दिव्यांग मुले व पालक याना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमात संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांनी आपले बौद्धिक दिव्यांगजन मुलांना शैक्षणिक साहित्याचे महत्व आणि केंद्र शासनाच्या योजनेबद्दल सांगितले. या कार्क्रमामध्ये संस्थेतील शिक्षक आणि विद्यार्थी प्रशिक्षण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**जाहीर नोटीस**

आमचे अशिल श्री.संजय नकुल शेलार व श्री.यशवंत बाळाराम शेलार यांनी खालील मिळकत विकत घेण्याचे मान्य केले आहे. खालील वर्णनाची मिळकत श्रीमती.जयश्री चारुहास पन्हाळे यांच्या ताबेकब्जात असल्याने त्यांचेकडून आमचे अशिल श्री.संजय नकुल शेलार व श्री.यशवंत बाळाराम शेलार यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : दुंदराई, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| दुंदराई, ता. पनवेल, जि. रायगड | ३१ | ४/अ | ०-०५-१० पो.ख. ०-००-५० एकूण क्षेत्र ०-०५-६० | ०.८१ |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अ‍ॅटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच आत खालील पत्यावर प्रथम दर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/०७/२०२२

**सही/-**
**ॲड.विजेंद्र नारायण मुंढे**
**(बी.ए.एल.एल.बी.)**
**पत्ता : पायोनिअर सोसायटी, स्वामी नित्यानंद रोड, तळमजला, ठाणा नाका, पनवेल**

## मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरासमोर उभी करून ठेवलेली मोटार सायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना कोळवाडी, पडघे गावात घडली आहे. विष्णू चर्मकार यांनी त्यांची ३५ हजार रुपये किमतीची काळ्या रंगाची होंडा ड्रीम युगा मोटार सायकल क्रमांक एमएच ४६ एडब्ल्यू ०१०२ हि राहत्या घरासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर मोटार सायकलीची चोरी केल्याची घटना घडल्याने या बाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत १) श्री.मारुती बळीराम सांगडे, २) श्रीमती.जिजाबाई एकनाथ पावशे, ३) श्री.महादू बळीराम सांगडे, ४) श्रीमती.रंजना शरद उलवेकर, ५) श्री.महेंद्र भाऊ सांगडे, ६) श्री.महेश भाऊ सांगडे, ७) श्रीमती.भागुबाई भाऊ सांगडे यांचे मालकीची आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नितळस, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रं. व उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४५ | भो वर्ग २ | ०-५१-८० पो.ख. ०-००-०० एकूण ०-५१-८० पैकी ०-२०-०० | ५.९४ |

उपरोक्त मिळकत आमचे अशिलाने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्रीचा करार, मक्ता, रस्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, ट्रस्ट, इजमेंट, बोजा, मृत्यूपत्र, दान बक्षिस, अखत्यारपत्र, कुळहक्क इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार वकील यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही लेखी हरकत, तक्रार दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून मी सदर मिळकतीचा व्यवहार माझे अशिल पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १६/०७/२०२२

**सही/-**
**ॲड.विशाल दत्ता भोपी**
**वकील, उच्च न्यायालय**
**घर नं.२४३, सदाशांती निवास आकुर्ली, मालेवाडी, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९०८२०३८९६०**

## माथेरानचा शार्लोट लेक ओवरफुल्ल तर घाटातील धबधबे जोरात

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचे पावसाळी पर्यटन जोरात असून पावसाने येथे दिलेल्या जोरदार सलामी ने येथील घाटातील धबधबे सक्रिय झाले असताना माथेरानचा शार्लेट लेक भरून वाहू लागल्याने येथील धबधब्यावर पर्यटकांची तूफान गर्दी पाहवयास मिळत आहे.



माथेरान हे थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे, मात्र पावसाळ्यात डोंगरदऱ्यातून तयार होणारे फेसाळणारे पांढरे शुभ्र धबधबे पर्यटकांना भुरळ घालत असतात. सध्या पाऊसाने चांगलाच जोर धरला असून माथेरान मध्ये आता पावसाळी पर्यटन हंगाम सुरू झालाय, येथे डोंगरदऱ्यांमध्ये ओसंडून वाहणारे पांढरे शुभ्र धबधबे इथला हिरवा गार निसर्ग आणि पावसाळी धुक्यातून रस्त्याने वाट शोधत जाताना पर्यटकांच्या होणार्या मज्ञा मस्तीची वेगळाच आनंद असतो.

सध्या पाऊसाने चांगलाच जोर धरला असून माथेरान मध्ये आता पावसाळी पर्यटन हंगाम सुरू झालाय, येथे डोंगरदार्यांमध्ये ओसंडून वाहणारे पांढरे शुभ्र धबधबे इथला हिरवा गार निसर्ग आणि पावसाळी धुक्यातून रस्त्याने वाट शोधत जाताना पर्यटकांच्या होणाऱ्या मज्ञा मस्तीची वेगळाच आनंद असतो. माथेरानमधील पावसाळी पर्यटन हंगामात पर्यटकांचे मुख्य आकर्षण म्हणजे येथील नेरळ ते माथेरान या रस्त्यावर लागणारा मोठा धबधबा पर्यटकांना आकर्षित करत असतो.

या धबधब्यावर शेकडोच्या संख्येने पर्यटक इथं मनसोक्त आनंद लुटतात, यामध्ये महिला, पुरुष, लहान मुलांसह सगळेच येथे या वॉटरफॉलची मजा घेताना दिसतात. पावसाळ्यात येथील डोंगरांवर पसरलेली हिरवी शाल,पांढरा शुभ्र कोसळणारा पाऊस त्यातच धुके व वाऱ्याचा लपंडाव हे माथेरानचे पावसाळी आकर्षण असून माथेरानच्या सुरक्षित पर्यटनासाठी मागील काही वर्षांमध्ये येथे पर्यटकांचही संख्या वाढतच आहे. माथेरान मध्ये प्रवेश करणारा प्रत्येक पर्यटक येथील शार्लेट लेक ला भेट दिल्याशिवाय जात नाही त्यातच हा तलाव भरून ओसंडून वाहू लागल्याने पर्यटकांना एक पर्वणीच मिळाली असून ह्या धबधब्यावर भिजण्यासाठी पर्यटक गर्दी करू लागले आहेत तर प्रशासनाकडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये ह्या करिता गर्दीच्या वेळी पोलिस तैनात करण्यात येत आहेत

Kamalgauri Hiru patil shikshan sanstha

**B.K.PATIL INSTITUTE OF PHARMACY**

(Affiliated to University of Mumbai and MSBTE, Approved by AICTE, DTE, PCI and Govt.of Maharashtra)

Address:-Plot no.29, Sec-11, Taloja Navi Mumbai

**Walk In Interview**

Applications are in invited for the following posts.

| Sr.no. | post | Qualification | Designation |
|---|---|---|---|
| 1 | 2 | M.Pharm(Pharmacology) | Assistant professor |
| | 2 | M.Pharm(Medicinal Chemistry) | Assistant Professor |
| 2 | 4 | B.Pharm or M.Pharm | Lecturer |
| 3 | 3 | D.Pharm | Lab.Technician |

Note:-Qualification and experience required as per AICTE and PCI Norms Candidate may mail their resumes on kghpss.2019@gmail.com

**Principal**